

१९५६
. ग्र. सं. ठाणें
काव्य
१३५२
REFBK-0009091
REFBK-0009091

मराठवाडा साहित्य परिषद् पुरस्कृत प्रकाशन

# मेनका

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 29258 वि: काव्य
क्रमांक 13452 नों: दि: 23/1/58

कवि :

**यशवंत कानिटकर**

प्रस्तावना :

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

REFBK-0009091
REFBK-0009091
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७०९

मूल्य दीड रुपया

प्रकाशक :

**रा. ब. माढेकर**

अध्यक्ष :

मराठवाडा साहित्य परिषद्

इसामियाबाँजार, हैदराबाद

मुखपृष्ठावरील चित्र :

— **भगवान भालेराव**

१९५६

(सर्व हक्क स्वाधीन)

मुद्रक :

**जयहिंद प्रिंटिंग प्रेस**

मालक व संचालक :

**भारत मुद्रक आणि प्रकाशक लि.**

अ, ८।५५८ नारायणगुडा, हैदराबाद द.

## निवेदन

श्री. यशवंत कानिटकरांचा 'मेनका' हा काव्य-संग्रह मराठवाडा साहित्य परिषदेचें पुरस्कृत प्रकाशन म्हणून प्रसिद्ध करतांना आम्हांस आनंद वाटतो.

आशापूर्ण जिजीविषा, भावनोत्कट चिंतनशीलता, सौंदर्यवेधक कल्पकता आणि समृद्ध भाषाशैली या गुणांचा चेतोहर समन्वय श्री. कानिटकरांच्या काव्यांत आढळतो. आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीनें मराठवाड्यांतील कविपरंपरेंत श्री. कानिटकरांना आगळेंच स्थान लाभत आहे.

महाराष्ट्रांतील ख्यातनाम तत्त्वचिंतक, विद्वद्रसिक, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची मर्मग्राही, विवेचक आणि रसपूर्ण प्रस्तावना या संग्रहास लाभली हा या संग्रहाचा विशेष होय.

प्रस्तुत 'मेनका' या काव्यसंग्रहास महाराष्ट्र शारदेच्या मंदिरांत यथोचित् मानाचें स्थान लाभेल असा विश्वास वाटतो.

प्रस्तुत संग्रह प्रकाशित करण्याच्या कामीं सहकार्य करणाऱ्यांचे मनःपूर्वक आभार !

— प्रकाशक

## कवीचें मनोगत

प्रस्तुत काव्यसंग्रह प्रकाशित होतांना मनांत अनेकविध भावनांची गर्दी उसळली आहे.

ज्यांच्यामुळें काव्याला प्रेरणा मिळाली व ज्यांच्या रसग्रहणामुळें आणि टीकेमुळें कवितेला कांहीं आकार आला त्यांची आठवण या वेळीं होणें स्वाभाविक आहे. त्यांच्या सहकार्याचें स्मरण या वेळीं तीव्रतेनें होत आहे.

श्री. प्रा. भगवंत देशमुख, श्री. प्रा. भालचंद्र कहाळेकर, श्री. प्रा. रा. ब. माढेकर, श्री. अनंत भालेराव आणि श्री. तु. शं. कुळकर्णी यांचें कवितांच्या जन्मापासून नामकरण, निवड, प्रकाशन, सर्वच बाबतींत अमोल साह्य झालें.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीं आपलेपणानें कामाचा व्याप असतांहि मर्मग्राही रसपूर्ण प्रस्तावना लिहून दिली. त्यांचे शब्दांत आभार मानले तर उपचारात्मक ठरतील म्हणून मनोमनच कृतज्ञता व्यक्त करतों.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या सहकार्यानें प्रस्तुत संग्रह प्रकाशित होत आहे तेव्हां परिषदेचा ऋणनिर्देश करणें माझें कर्तव्यच आहे. तसेंच इतर सर्व सहकाऱ्यांचेहि मनःपूर्वक आभार.

**–यशवन्त कानिटकर**

अनुक्रम २९२८८ दि: ९.१०.६५
क्रमांक ९३८२ नों: दि: २.३.१९७

# प्रस्तावना

माझे मित्र कवि श्री. यशवंतराव कानिटकर यांचा हा कवितासंग्रह प्रसिद्ध होत आहे याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करतों. या कवितांपैकीं अनेक कविता अनेक वर्षांपूर्वी मी त्यांच्या कंठांतून ऐकल्या आहेत. त्यांपैकीं 'मास्तरीण' ही कविता मी ऐकल्याचें मला स्पष्टपणें आठवतें. १९४३–५२ पर्यंतच्या काळांत निबद्ध केलेल्या या कविता आहेत.

हा काळ नवकाव्याच्या उदयाचा असला तरी ह्या कवितासंग्रहास नवकाव्याच्या सदरांत दाखल करतां येत नाहीं. यांत मुक्तछंद आहे, नवकाव्याच्या वळणाच्या अनेक कविताहि यांत आहेत, तरी यास नवकाव्य अशी संज्ञा देतां येत नाहीं. नवकाव्य ही संज्ञा येण्यास दोन प्रकारची पार्श्वभूमि असावी लागते. एकतर आपल्या काळांतील समग्र जीवनाची म्हणजे आधुनिक जीवनाची पूर्ण शिसारी येऊन पूर्ण निराशेनें मन भरावयास पाहिजे; आणि दुसरें असें कीं, जुन्या आकृतिबंधांत ( Old Pattern ) व्यक्त होणाऱ्या स्पष्ट व विशद अनुभवांच्या जगां-

तून बाहेर पडलेल्या मनानें नव्या, अगदीं वेगळ्या, धूसर व अंधुक अशा अनुभवांच्या जगांत शिरलें पाहिजे. हे अंधुक अनुभव रूढ संकेतांत बसवतां येत नाहींत; किंवा रूढ शद्वार्थांच्या संगतींत व्यक्त होण्यास मारामार पडून, ते कसे आहेत व काय आहेत, हेंहि सांगता येत नाहीं. या दोन्ही गोष्टींना या कवितासंग्रहांत स्थान नाहीं.

या कवीची जीवनश्रद्धा जोमदार व बळकट आहे. या कवितासंग्रहांतील ३–४ कवितांमध्यें जीवनांतील निर्घृणता, हीनता व विनाशकारी आत्यंतिक भयाची व्याकुलता प्रकट झालेली दिसत असली तरी त्या निर्घृणतेनें, हीनतेनें वा भयांच्या व्याकुलतेनें कवीचें मन कायमचें व्यथित व निराश बनलेलें नाहीं. उलट असें सांगतां येतें कीं, शिवरूप असलेल्या जीवनशक्तीचा कधींहि पराभव होणार नाहीं; ती प्रलयाग्नीलाहि शांत करणारी शक्ति आहे; असा कवीच्या मनांतला स्थायीभाव आहे. म्हणून असें निर्भ्रांतपणें म्हणतां येतें कीं नवकाव्याला लागणारी मनःस्थिति या काव्याच्या प्रणेत्याला लाभलेली नाहीं.

याकरितां या कवितासंग्रहांतील 'मेनका' ही कविताच पहावी. या कवितेचें तात्पर्य असें कीं, विश्वामित्रानें नवी सृष्टि उत्पन्न करण्याकरितां अत्यन्त उग्र तप आचरण्यास प्रारंभ केला; त्या तपानें सर्व विश्व करपून निघून प्रळयकारी परिस्थिति

निर्माण झाली; विश्वाचा योगक्षेम धोक्यांत आला; सर्व जीवित रूक्ष व नीरस बनलें; म्हणून सौंदर्य-शक्ति मेनकेस विश्वामित्राच्या तपोभंगाकरितां पृथ्वीवर यावें लागलें; मेनकेनें विश्वामित्राचा तपोभंग करण्यांत यश मिळविलें; त्यामुळें विश्वाला पुन: सुंदर नवजीवन लाभलें; असें वर्णून तपोभंगाचें नैतिक समर्थन यांत केलें आहे. भारतीय प्राचीन पौराणिक कथांच्यामध्यें अनेक अप्सरांच्या कथा प्रसिद्ध आहेत. आधुनिक कवींनाहि त्या अप्सरांचें खूप आकर्षण आहे. 'उर्वशी' 'उर्वशीस' इत्यादि आधुनिक कवींच्या कविता प्रसिद्ध आहेत. या कविता-संग्रहांतील 'मेनका' ही कविता त्यांपैकींच होय, असें म्हणतां येईल. यांतील विश्वामित्र व मेनका या दोन्ही व्यक्ति रूपक म्हणून येथें उल्लेखिलेल्या आहेत.

आधुनिक मानवांचें विज्ञानांत व यंत्रतंत्रविद्येंत पुढारलेलें विश्व म्हणजे या कवितेंतील विश्वामित्र होय. 'नवीन सर्जनशीलता' हा या ऋषीचा तपोमंत्र आहे. नव्या जगाची, नव्या मानवाची, नव्या सृष्टीची रचना करण्याची त्याच्या ठायीं 'अदम्य, उद्दाम महदाकांक्षा' आहे. 'अभिनव विश्व नवजीवन प्रतिज्ञोत्तरें करीन निर्माण' अशी त्याची श्रद्धा आहे. त्याकरितां त्यानें 'उग्र, प्रखर, दारुण, विराट' तप मांडिलें आहे. या साधनेंत जीं ध्येयें त्याच्या मन:-

चक्षूपुढें उभीं राहिलीं आहेत त्याबद्दल कवि म्हणतो–

‘नव्या जगाच्या स्वर्ण–जरतारी स्वप्नसृष्टींत झाला रममाण।’

‘हवेंत अनन्त उठले इमले।’

‘दर्शनें तयांच्या झाला वेडापिसा हेकट आग्रही।’

‘तोडून साऱ्या तारा वीणेच्या वाजवूं पहातो गत अभिनव।’

‘पाकळी पाकळी करून विलग पुनरपि त्याचें करूं पाहतो पुष्प दळदार।’

‘हें केवि घडे?’

ही या क्रांतिप्रवण शक्तीवरील मूलभूत टीका होय. आतांपर्यंत माणसानें जी नैतिक श्रद्धा व सभ्यता घडविली आहे ती उस्कटून क्रांति घडविण्याचा यत्न हा विनाशास कारण होत आहे :–

‘मरण–मुक्तिचा मार्ग शोधतांना ओढवलें मात्र मरण जन्माचें।’ तात्पर्य, ‘वसुंधरेचें तप्त वैरागार’ बनवून शांतीची नवी सृष्टि उत्पन्न करण्याचा यत्न हा विफलच होणार. परंतु हा तत्त्वविचार त्या क्रांतिकारक विश्वामित्राच्या मनास आवरूं शकत नाहीं. ‘कुठल्या उपायें वळवावें मन मुनिवर्याचें?’ अशी विवंचना पडते; त्याच्यापुढें कसलेच उपाय चालत नाहींत. एक उपाय अखेरीस

लक्षांत येतो. सौंदर्यशक्तीची मोहिनी! जीवनाच्या त्या मूलभूत बीजशक्तीला, सुंदरतेला, आवाहन करण्यांतच यशाची शक्यता कल्पितां येते. हीच 'मेनका' होय. सौंदर्यशक्ती ही क्रांतिकारी व विनाशकारी प्रवृत्तींना आवळून टाकण्याचें समर्थ साधन होय; कवीच्या प्रतिभेला आलेला असा प्रत्यय हें एक मोठें तत्त्वदर्शनच होय :–

'करावी योजना सौंदर्यशक्तीची रूपराणीचीं या कार्यास्तव।' ह्या सौंदर्यशक्तीचें विश्वव्यापी रूपक खगोलाच्या अनन्त विस्तारांत कवीनें उभारून दाखविलें आहे. या अल्पशा भूगोलाच्या रक्षणार्थ अतिविशाल खगोल सज्ज होतो, असें कवीस दिसतें. हें एक मनोहर विश्वरहस्य आहे :–

'एकवटले सारे खगोल बंधुभावानें एक भूगोलाच्या रक्षणासाठीं।'

'व्योमनदीच्या मृदुल पुलिनीं प्रसाधनाची चालली साधना।'

या प्रसाधनाचीं नाजुक साधनें फार हळुवार वृत्तीनें कवीनें भाविलीं आहेत. उदाहरणार्थ–

'नंदनवनांत यक्षकिन्नरांनीं आळविलेल्या स्वरालापांना।'

देवदेवेन्द्रानें सरूपता दिली :–

'त्या स्वरतंतूंचें विणलें वस्त्र गर्द रेशमी नर्म मुलायम।'

तें नेसून ही स्वर्गीय सौंदर्यराज्ञी भूगोलाचा ताप हरण करण्यास भूगोलाकडे निघाली आहे :-

'झळकें वदनीं नवोढेचें स्मित मुग्ध, अर्धस्फुट, चंचल चोरटें आर्द्र अरुवार।'

'जणू बीजेचें चांदणें अस्फुट गूढ, गोरटें, स्निग्ध, सुकुमार।'

तिच्याबरोबरच 'राग, रस, गंध, रूप, स्वर, रंग' ही वसंतसेना जयजयकार करीत निघाली आहे. तिच्या सौंदर्याचा भूगोलास स्पर्श झाल्याक्षणींच विश्वामित्राच्या उग्र तपानें दग्धप्राय झालेल्या विश्वाचा कायाकल्प होतो :-

'सौंदर्यसंस्पर्शें घडे कायाकल्प अखिल विश्वाचा'

लगेंच विश्वामित्राच्या उग्र तपाची आग शांत होऊं लागते, कठोरभाव मृदु बनतात, उष्णतेच्या गाभ्यांत शीतलता उदित होते. तपाची विस्मृति होऊन रतीचा विळखा त्याच्या तप्त देहाभोवतीं पडतो. शकुंतला जन्मते! तिच्यापासून भारताचा भरत होतो.

विश्वाच्या विनाशक शक्तीवर विजय हीच रतिशक्ति मिळविते म्हणून तिला शिवशक्ति अशी संज्ञा कवीनें दिली आहे. परंतु ही शिवशक्ति इतकी प्रभावी खरोखरच आहे काय? अशी शंका मात्र कवीच्या मनाला विव्हल केल्याशिवाय रहात नाहीं.

'अंधाराला खडे मारिती' या दुसऱ्या कवितेंत ही अस्वस्थ करणारी भावना व्यक्त झाली आहे. विश्वाला गिळणाऱ्या अनंत व शाश्वत काळोखाचीं मायावी रूपांत भटकणारीं अपत्यें या विश्वाला नित्य भेडसावीत असतात, असें त्याला वाटतें. म्हणून त्यांतून 'शिवशक्तीला कुणी वांचवा' अशी हांक तो मारतो. 'कोटि चंद्र या कोटि सूर्य या' अशी व्यर्थ हांक तो मारतो. बायबलमधील सृष्टीच्या उत्पत्ति प्रकरणांतील वाक्य त्याला धीर देतें. 'होतें तममय आधीं सारें। प्रकाश होवो प्रभू बोलला। प्रकाशमय अन् सारें झालें।' परंतु माणसाच्या हातांत हें नाहीं. माणसाच्या 'दिवाळींतल्या मिणमिण पणत्या' काय उपयोगी पडणार? 'कुठवर पिचक्या पणत्यांनीं या। करावयाचें तमविध्वंसन।' 'पुटपुटल्या त्या स्वतःशींच अन् मिटतां आपुलें ज्योतिर्लोचन।'

ह्या विश्वांतील अगाध अंधकाराच्या पोटींच कवीला प्रकाशाचा गर्भ प्रतीत होतो. 'ये नववर्षा' या कवितेनें नव्या वर्षाच्या कल्याणमयी भवितव्यतेला आवाहन दिलें आहे. प्रकाशानें भरलेला अरुणाचा घट हातांत घेऊन वसुंधरेस सर्व दिशांनीं प्रकाशाचें स्नान घालीत ती येत आहे! तिला अमावास्येची उपमा देत कवि म्हणतो–

'येई नववर्षा अमेपरी तूं
अंधाराच्या धारा ओतित खालती।'

'मात्र तिच्यापरी फुटूं देत उरी।'

'लक्ष नक्षत्रांचे प्रकाशाचे कोंभ।'

ही नववर्षाची भवितव्यता लक्षांत घेतांना गतवर्षाची कृतज्ञता ठेवावी लागते, हें कवि विसरत नाहीं. उदाहरणार्थ–

'हे नववर्षा गतवर्षाच्या कळीचें फूल तूं।'

'बीजकोशामधि फळाची प्रेरणा।'

ही नववर्षी भवितव्यता म्हणजे निसर्गांतील इंद्रियगम्य गुणांची समृद्धि होय :–

'येई नववर्षा वसंत होऊनी'
'दळादळांतून सांकळूं दे रस'
'कळ्या फुलांतून भरूं दे सौरभ'
'जळाथळाचे सारे अंगराग'
'रस रंग गंध रूपमती ही'
'होऊं दे पृथिवी'

ती भवितव्यता गर्भित, सूक्ष्म व सूचक रूपाचीहि आहे :–

'होऊन ये तूं नववधूचें विश्वस्त स्मित!'

ती सूक्ष्मरूपानें विश्वच आहे :–

'नितळ निर्मळ दंवाच्या दर्पणीं।'

'बिंबलेलें विश्व सुरंगमय तूं।'

ही 'नववर्षी' संतांच्या आशीर्वादानें पावन

व्हावी, अशी मागणी मागून ही कविता समाप्त होते.

ही समृद्धीची नववर्षी भवितव्यता संकटग्रस्त असते हें कवीला दिसूं लागतें. त्याला त्यामुळें 'हुरहुर' लागते. ही शिणविणारी 'हुरहुर' एका कवितेंत वर्णिली आहे :–

'परि एक टोचणी नित्य उरीं बोचते।'

कोवळ्या कळ्या पाकळ्यांतले दंवबिंदूचे मोती, त्यांचीं अहेव लेणीं, झंझावातानें केव्हां नष्ट होतील याचा नेम नसतो. 'टिचार मोहरानें लदलदलेली आंबराई' मनांत हुरूप उत्पन्न करते खरी, परंतु अकालवृष्टीनें तो हुरूप हिरावून केव्हां नेला जाईल, हें सांगवत नाहीं, प्रीतीलाहि तेंच भय !–

'हुरहुर निरंतर श्रान्त करितसें चित्त'
'कीं अवचित शर येईल अज्ञातामधुनी'
'अन् प्रीतपांखरूं टाकिल गे विंधुनी'

हीं 'हुरहुर' दुसऱ्या एका 'उपेक्षा' या कवितेंत खरी ठरते. लोचनीं शारदीय शर्वरीस साठविणारी भामिनी प्रियकरांस पांखराप्रमाणें फशीं पाडते. तिच्यापासून त्याला दगाफटका होतो; तेव्हां तो तिला करुणवाणीनें म्हणतो–

'कामरूपिणी मदालसे निजमंथर चालींतुनी'

‘भावफुलांची शेज सुकोमल तुडविशि सौदामिनी’
‘चटकचांदणी सांनिध्याची चटक लावुनी मला’
‘शिलाखंड होण्यास लोटुनी दिलेस कां भूतला’

इतक्याहि स्थितींत प्रियकर स्वतः हिंमतीनें सावरतो, तिच्या या क्रूर वंचनेनें भावनांची राख झाली तरी त्याची तमा न बाळगतां ‘उपेक्षा’ करतो–

‘दग्ध जाहले भाव सांवडुनि राख तयाची अतां’
‘काळनदीमधि दिली झोकुनी स्मृति गताची वृथा’

हें भक्कम मनाचें लक्षण आहे, ही विरक्ति नव्हे.

कारण विरहव्यथेनंतर उन्मत्त सुखाचा जनास जो क्षण लाभतो त्याचें तो स्वागत करण्यासहि तयार आहे; क्षणभर जरी ही मृण्मयता विसरून आनंदसागरांत बुडी मारतां आली तरी कल्याण झालें. ‘उद्याची चिंता कशाला ?’

‘तरुचीं पानें पिकति उद्याच्या वाहुनिया चिंतेला’
‘नको काळजी व्यर्थ उद्याची वा – होऊ पाचोळा’
‘म्हणुनि राणी तुज विज्ञापन देइ निरोप दिव्याला’
‘अंधाराच्या धारामधि त्या चिंब होऊं दे मला’

या बेहोष बनविणाऱ्या सुखाच्या क्षणाचा महिमा ओळखणारें प्रेमकाव्य या कविता–संग्रहांत भरपूर आहे. प्रेमकाव्याचे अनेक सुभग अलंकार घडवून प्रतिभेच्या महालांत कवीनें मांडून ठेवले

आहेत. ते म्हणजे ‘ शेजी माझ्या अंगणांत ’ ‘ सरो न हि मधुरात ’ ‘ कणिका ’ ‘ पारध ’ ‘ क्षण सावल्या भेटल्या ’ ‘ सखि गीत मधुर तूं ऐकविलें ’ ‘ तूं मनोज्ञ बाला ’ ‘ चल ये राणी ’ ‘ आज तुझ्या संगतींत राणी ’ ‘ हुरहुर ’ ‘ उपेक्षा ’ ‘ कशानं मन झालं आतुर ’ ‘ तूं गमशि मूर्तसौंदर्य ’ ‘ अशा कलत्या दुपारीं ’ व ‘ सखि माझें मनोगत ’.

कित्येकदां प्रेमाकरितां तळमळणारे जीव एकमेकांस आपलें मनोगत बोलून दाखविण्यास असमर्थ ठरतात, कारण कांहीं केल्या अंतर तुटत नाहीं किंवा त्या ओढीचा अर्थ अनन्त वाटतो. उकलून सांगणें अशक्य होतें; काय होतें कोणास ठाऊक. म्हणून–

‘ सखी माझे मनोगत अडेदडे ओठाआड ’

‘ कसें कथायाचें तुज ’

अशा विवंचनेंत कायम गुंतून रहावें लागतें. त्याच्यातर्फे –

‘ रात्रीं आकाश बोलतें लक्ष नक्षत्र शद्बांनी ’

तरी उमगत नाहीं. त्याला वेड म्हणावें काय ? सृष्टींत त्याचा प्रत्यय मिळतो;

‘ घेत सूर्याचा मागोवा फिरे वेडें सूर्यफूल ’

‘ आणि वायू गंधवेडा रसगंधाच्या शोधांत ’

‘ चंद्र झुरे ढगाआड पानाआड, झुरे कळी ’

कित्येकांचें मनोगत शद्बावांचून निःशद्ब परिसरांत एकमेकास समजतें व सर्व अंतर अटतें; तेथें



स्थळप्रत.

काळवेळेचा भेदहि लोपतो. ‘ अशा कलत्या दुपारीं ’ सात्त्विक व शांत परिसरांत जीवनाचें पोषण करण्यास सिद्ध असलेल्या वातावरणांत रतिसुखाची उत्कंठा दिवस व रात्र हा भेद नष्ट करते. हिवाळ्याचीं उन्हें खाणारीं काळीशार उभीं पिकें माणसास निश्चितपणाचें आश्वासन देतात.–

‘ पोटऱ्यांतला जोंधळा कांति पिऊन नभाची ’
‘ रची अर्धजागृतींत गाणीं उद्यां परवांचीं ’

संकेत ठरलेलीं माणसं वाट काढून गुपचुप चाहूल न लागतांच एकत्र येतात तेव्हांच –

‘ अशा कलत्या दुपारीं कोण जाई पांदींतून ’
‘ घेत सांचल कुणाची टाकी पाऊल जपून ’
‘ अशा कलत्या दुपारीं लवणांतल्या थळांत ’
‘ झाली भर दिसा रात कशी कुणास माहित ’

सृष्टि व समाज जेथें अनुकूल, तेथें सात्त्विक रतीचें पूर्ण साफल्य होतें. या पूर्ण साफल्याचें गीत ‘ सये भावजयी ’ हें होय. –

‘ रास तांदुळाची पायदळीं तुडवीत ’
‘ सनई सुरांत आशीर्वादांत नहात ’
‘ सये भावजयी अशी आलींस घरांत ’

सप्तपदींतील ‘ तांदुळाची रास तुडवीत येतें ’ असें म्हणून सृष्टीची आणि ‘ आशीर्वादांत नहात ’ असें म्हणून समाजाची अनुकूलता दाखविली. तिचा

शृंगार अनंत सुखसंवेदनांचा व तृप्तीचा आणि गर्भारपण नव्या अंगकांतीनें खुललेलें दिसतें. –

‘ सागराच्या मुखीं पाणी नदीचं माईना ’
‘ कांति मोतियाची अंगीं राहिली भरून ’
‘ मिटल्या कळींत परागाची चूळवूळ ’
‘ सुखावून कळी घेई वाऱ्याची चाहूल ’
‘ ......... ........................ ’
‘ सावळ्या ढगाला लोळ विजेचा झेपेना ’
‘ धुंदल्या देहाची चाल मध्यान्ह सूर्याची ’
‘ आणि डोळियांत नीज जागल्या रात्रीची ’

या कवितासंग्रहांतील कोणतीच कविता मामुली नाहीं. परंतु कांहीं कवितांमधील कांहीं कांही ओळी गाळल्या तर अर्थाची भावना अधिक सूक्ष्मपणें परिणामकारक ठरलीं असती, असें वाटतें, कारण भावनेची उंची संपल्यानंतरही कांही ओळी शिल्लक राहतात. त्या ओळीहि सुंदर आहेत परंतु भावनेच्या संपन्नतेंत भर घालीत नाहींत. त्यामुळें भावना उतारास लागते. उदाहरणार्थ, ‘सखी माझें मनोगत’ ह्या कवितेंतील शेवटच्या चार सुंदर ओळी गाळल्या असत्या तर मनोगत कळून न कळल्यासारखें राहिलें असतें. त्यामुळें त्या मनोगतांची अशांत उत्कंठा भोगण्याचें संपलें नसतें. जें मनोगत आकाश लक्ष नक्षत्रांनीं व्यक्त करण्याचा हव्यास धरतें तें शेवटच्या चार ओळींत खुलें कसें होतें, हें पटत नाहीं. त्या ओळी अशा–

'धूप स्वयें जळूनिया निर्मी सुगंधाचें लेणें'
'धन्य मानील तुजला जरी त्यावेसें वाटलें'

पीडित, भ्रष्ट, निंद्य, दरिद्री, अनाथ, उध्वस्त व बीभत्स अशा जीवनदशेची दखल या कवीनेंहि घेतली असल्यामुळें हा कवितासंग्रह प्रामुख्यानें प्रेमकाव्याचा असला तरी त्यांत नवकाव्याचाहि लहानसा परंतु सुबक अलंकार सांपडतो. 'मास्तरीण' 'खाणावळींतलें अन्न', 'नगरांतील राजपथा' व 'निर्वासित' ह्या कविता या सदरांत बसतात. दरिद्री व अनाथ मास्तरणीचें यौवन प्राथमिक शाळेची नौकरी करीत आणि क्षुद्र व विफल जीवन जगत असतां जळून गेलें आहे; तिच्या राहत्या बिन्हाडाकडे ती आली आहे; त्या बिन्हाडांतील तिची वस्ती एकलकोंडेपणाची, भिकार व झुरळासारखी घृणास्पद आहे. निद्राभंगाचा तिला रोग जडला आहे–

'आली रात्र हडळीण तुझी शांति संहारिणी'
'आली दांत विचकित आली केश पिंजारुनी'

या ओळींनीं भय व विषाद मनाची पकड घेतात. 'खाणावळींतलें अन्न' रोज सेवन करण्याचें ज्याच्या कपाळीं असतें तोच त्या अन्नाकडून खाल्ला जातो; हें या कवितेंत उजेडांत आणलें आहे. 'नगरांतील राजपथा' या कवितेंत हैदराबादेंतील राजपथ नजरेस पडतो. तो राजपथ असूनहि त्याला सतत दुःखाचे प्रहार सहन करावे लागतात; या कवितेंत

त्याचा हतभागीपणा वर्णिलेला आहे. तो राजपथ डांबरी आहे. त्याच्या वर किंवा बाजूला विजेच्या तारा ताणलेल्या आहेत. त्याच्यावर फार मोठी वर्दळ चाललेली असते. तो उन्हाळ्यांत रोज तापतो तेव्हां डांबर चिघळते, त्यावर बुटांच्या लाथांनीं ओल्या जखमा होतात, त्या रोज वाळतात व नव्या होतात. हा छळ कधीं संपत नाहीं. तो राजबंदी आहे त्यामुळें त्याच्यावर उग्र रक्षकांचा सतत पाहरा आहे.

‘ दो बाजूस वीजखांब रक्षक एकाक्ष उभे ’
‘ रोखुनि भोकर डोळे करिती पाहरा तुजवर ’

या राजपथाचे हाल कधींच संपणार नाहींत म्हणून करुणा येऊन कवि म्हणतो–

‘ मर्त्य असे मानव मी मेलो म्हणजे सुटलो ’
‘ चिरंजीव तूं सलतें शल्य हेंच राजपथा ’

अशा जीवनापेक्षां मरणच स्वीकरणीय वाटावें.

‘ निर्वासित ’ ही कविता वास्तवोक्ति या दृष्टीनें फार खुबीची ठरतें. शहराच्या फुटपाथवर रोज बसणारा, उन्हांत रोज तापून घामानें डबडबलेला सिंधी निर्वासित विस्कटलेल्या वस्त्रांच्या ढिगाचें दुकान मांडून उस्कटलेल्या संसाराचीं घडी बसविण्याचा व्यर्थ यत्न करीत असतो. त्याची रक्ताश्रूंची आग शमूं शकत नाहीं. ती आग ज्ञानेश्वर-तुकारामांच्या गाथ्यांनीं सर्व भूतांठायीं भग-

वंतांचें दर्शन करून घेऊन विझवा असें कवि म्हणतो. येथपर्यंत कविता ठीक आहे. परंतु या ज्ञानेश्वर-तुकारामादिकांच्या उल्लेखांतून प्रसंगोपात्त निघालेल्या पुढील शेवटच्या चार ओळी मात्र विसंगत ठरतात. कारण या निर्वासिताशीं त्या ज्ञानेश्वर-तुकारामादिकांची निर्वासित म्हणून केलेली तुलना जुळत नाहीं. येथें ही कविता फार खटकते.

या कवितासंग्रहाचा हा परामर्श केवळ दिग्दर्शनार्थ केला आहे. या कवितासंग्रहांत उच्च प्रतिभेचीं अप्रतिम लेणीं पुष्कळच आहेत. कवीचें जीवनविषयक तत्त्वज्ञान या कवितासंग्रहांत कसें प्रतिबिंबित झालें आहे, हेंच मुख्यतः सांगावयाचें होतें. शब्दांची सुंदर निवड, प्रसन्न वाक्यशैली, कल्पनाविलास, भावनांची उत्कटता व वैचित्र्य, इत्यादि गुणांमुळें हा संग्रह मराठी सारस्वतांत अत्यंत संग्राहय वस्तु म्हणून ठरेल यांत शंका वाटत नाहीं. हा संग्रह नवकाव्यांचा नसला तरी त्यांत जुनेपणाहि खास नाहीं. एवढेंच नव्हें तर, जीवनाचा आशय व्यक्त करण्यांत कवीच्या प्रतिभेनें अत्यंत खोल असलेल्या तत्त्वाला गवसणी घातली आहे.

वाई १६-११-५६ **लक्ष्मणशास्त्री जोशी**

## अनुक्रमणिका


| कविता | पृष्ठ |
|---|---|
| क्षण सांवल्या भेटल्या | २ |
| अशा कलत्या दुपारीं | ५ |
| शेजी, माझ्या अंगणांत | ७ |
| सये भावजयी | ९ |
| दे निरोप दिव्याला | ११ |
| तूं गमशि मूर्तसौंदर्य | १३ |
| कशानं मन झालं आतूर ? | १५ |
| नर्तकी | १७ |
| दीसभराच्या उन्हानं | १९ |
| सखि, गीत मधुर तूं ऐकविलें | २१ |
| स्वागत | २२ |
| हुरहुर | २३ |
| उपेक्षा | २४ |
| शांतिदेवतेस | २५ |
| कां वृथा अशा वल्गना ? | २७ |

| कविता | पृष्ठ |
| --- | --- |
| ये नववर्षा | २९ |
| कणिका | ३१ |
| खानावळींतलें अन्न | ३३ |
| पारध | ३४ |
| तूं मनोज्ञ बाला | ३५ |
| आज तुझ्या संगतींत राणी | ३७ |
| चल ये राणी | ३९ |
| रुबाया | ४० |
| सरो न ही मधुरात | ४२ |
| निर्वासित | ४४ |
| अंधाराला खडे मारिती | ४६ |
| नगरांतिल राजपथा | ४८ |
| सखि माझें मनोगत | ५० |
| मास्तरीण | ५१ |
| आली आभाळाला खार | ५३ |
| मेनका | ५४ |

थोरले मामा

कै. गणेश पांडुरंग जोशी

यांच्या पुण्यस्मृतीस

सादर समर्पण.

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्वक
अनुक्रम 29208 वि. 3/09
क्रमांक 73.42 नों. दि. 23/7/58

शिणलेल्या शब्दांना आम्ही
उगीच अर्थांस्तव दामटतों
मरुभूमिवर मृगजल शिंपुन
रसाळ मुक्ताफळें पिकवतों.

## क्षण सांवल्या भेटल्या

निशिगंधाचा ये गंध
शेज सोडून दलांची.
रातराणीचा ये श्वास
मिठी मोडून कळीची.

अंतरिक्षीं कुठें तरी
चालें तयांचें भ्रमण.
झाली अवचित भेट
झालें हृदयमीलन.

निघे तयांची थाटांत
वाऱ्यावरती वरात.
रेंगाळती घोटाळती
तुझे माझे श्वास तेथ.

घाईगर्दीमध्यें त्यांची
झाली सई चुकामूक;
झाले हताश निश्वास
झाले भग्न खिन्न मूक.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

रेखी चित्र संध्याराणी
ढगांवर नभावर.
रंग भरले लज्जेचे
नवथर लालसर.

चित्रांवर त्या डाळिंबी
नेत्र आपुले भेटले.
भाव-नवखे नाजूक
क्षणमात्र तरळले.

काळ्या बयेनें रात्रीनें
नेलें चित्र उचलून.
नाहीं राहिली डोळ्यांना
आतां संकेताची खूण.

तुझे नखाग्र स्पर्शतां
तार वीणेची कांपली
गोड झिणझिण्या देहीं
जागी झाली रोमावली.

गाईलेस गीत एक
भावनार्त ओलसर.
त्यांत मिसळले माझे
मूक निःशब्द मी सूर.

नाहीं ओळखलें तुवां
माझ्या सुरांचें स्पंदन.
तुज वाटे नाहीं साथ
कसें करावें गायन.

अखेरीस कंटाळून
वीणा दूर तूं फेंकली.
पिळवटल्या तारांनीं
आर्त किंकाळी फोडिली.

आली झुळूक वाऱ्याची
क्षण सांवल्या भेटल्या !
गेली झुळूक वाऱ्याची
आणि पुन्हां दुरावल्या !!

●

# अशा कलत्या दुपारीं

अशा कलत्या दुपारीं
देई जांभई शिवार.
उन्हें हिंवाळ्याचीं खात
उभीं पिकें काळीशार.

जखख माळरान सांगे
अर्ध्या मिटल्या नयनीं,
खुरटल्या झुडुपांना
गतकालची कहाणी.

पोटऱ्यांतला जोंधळा
कांति पिऊन नभाची
रची अर्ध जागृतींत
गाणीं उद्यापरवाचीं.

भिजलेल्या गवताचा
ओला आंबूस सुवास,
पाणथळींत चालला
त्याचा मंद श्वासोच्छ्वास.

अशा कलत्या दुपारीं
कोण जाई पांदींतून

घेत सांचल कुणाची
टाकी पाऊल जपून ?
चिंचेखालीं बारवेंत
घुमे उनाड पारवा
साउलीस बिलगला
माघामधला गारवा.
हिरव्याकंच होत्या चिंचा
गोड गाभुळल्या आतां
खडा टाकून पहाती
कुणी कुणी येतां जातां,
डहाळीच्या सावलींत
एक पांखराचं जुगं
वाट हरवे राईंत
ठावे त्याला सारे माग.
सूर आले अवचित
कोण वाजवी पावरी ?
फडफडल्या पापण्या
नैनमैना कां बावरी ?
अशा कलत्या दुपारीं
लवणांतल्या थळांत
झाली भरदिसां रात
कशी, कुणास माहित !

# शेजी, माझ्या अंगणांत

शेजी, माझ्या अंगणांत
बहरला सोन-चांफा,
फुलें तुझ्या घरामधीं
भिंतीहून घेतीं झेपा.

बागेमधल्या लिंबाची
तऱ्हा अशीच आगळी.
तुझ्या घरावरी त्याची
गर्द मायेची सावली.

परसांतल्या जाईला
लखडलीं लाख फुलं.
त्यांची तुझ्या घरावर
गोड सुवासाची झूल.

अंगणांतल्या झाडाला
उंच बांधला ग झोका.
तुझ्या माझ्या घरांवर
गस्त घालितो सारखा.

शेजी, माझ्या बागेमध्यें
चोरपावलीं ये वारा.

शीळ पोंचवी राघूची
तुझ्या मंजूळ मैनेला.

पाखडितो प्राण राघू
शेजी, तुझ्या मैनेसाठीं.

नको रागावूं जाजावूं.
कां ग कपाळाला आठी ?

नको काढूं उणं दुणं
नको करूं अंजं दुजं

येतां तिरीप उन्हाची
फूल कोमेजेल माझं !

# सये भावजयी

भाव अरुवार     उरीं ओठीं दडवीत
रास तांदळाची     पायदळीं तुडवीत,
सनईसुरांत,     आशीर्वादांत नाहात,
सये भावजयी,     अशी आलीस घरांत !
संसाराचा खेळ     त्यांत तुम्ही दोघे दंग.
तुळावा कशानें ?     मज मिळेना पासंग.
दुथडी मायेची     धार कंथा साहवेना.
सागराच्या मुखीं     पाणी नदीचं माईना.
स्वातीचा पाऊस     शिंप मिटली पिऊन
कान्ति मोतियाची     अंगीं राहिली भरून.
मिटल्या कळींत     परागाची चुळबूळ
सुखावून कळी     घेई वाऱ्याची चाहूल.
धरणीच्या नेत्रीं     स्वप्न सुगीचें गहिरें.
गात्रीं संक्रांतीच्या     हलव्याचे ग शहारे.
हिंडणभंवरी     आज पाय उचलेना.
सावळ्या ढगाला     लोळ विजेचा झेपेना.
धुंदल्या देहाची     चाल मध्यान्हसूर्याची,
आणि डोळियांत     नीज जागल्या रात्रींची,
शोभे कडेवरी     केवड्याचं ग कणीस,

केतकीस अशा निरखिशी तासतास !
उषेचा ओटींत अरुणाचा लाल गोळा,
द्विजराज गाती त्याच्या जन्माचा सोहळा.

मोत्यापोवळ्यांचा झाला अंगणीं पाऊस.
सये भावजयी ! तुझी उजवली कूस !

●

## दे निरोप दिव्याला.

विश्वदीप तो सहस्त्ररश्मी क्षितिजावर मालवला.
अवनीवरती धूमिलधूसर तमसमुद्र कालवला.
अमित असुनि तारका चंद्र नभिं विरहि भ्रमत एकला,
त्या चंद्राचें क्षीण चांदणें दुखवी रसरंगाला.
जडदीपांच्या मायावी मग प्रभेस कोण भुकेला ?
तुझ्या नि माझ्या मीलनसमयीं हा त्र्यस्थ कशाला ?
ऊनचांदणें खलुनि करिति जन रुचिर रम्य भवाला,
कालवुनी हास्याश्रु जीवनीं भरिति रंग आगळा.
नको ऊनचांदणें आसुहंसु सुखदुःखांचा काला.
विष हो अमृत ओठिं लावितां अधरींचा मधुप्याला.
तरुचीं पानें पिकतीं उद्याच्या वाहुनिया चिंतेला.
नको काळजी व्यर्थ उद्याची वा होऊं पाचोळा.
स्वयंप्रकाशी खद्योतहि तमिं शोधितसे तेजाला,
तसे खुळे, जन, ज्योतिष्मति तूं मग हा दीप कशाला ?
वीज नयनिंची स्मितप्रभा अन् दावी भाव निराळा;
तव स्पर्शामधिं ज्वाला शीतल ओठांवर रसशाला.
परंधाम दावील आपणा शय्येचा हिंदोळा,
जिथें न असफल आकांक्षांचा केविलवाणा मेळा.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकमत.
अनुक्रम २९२०८ वि: ३१०५
क्रमांक ९३५२ नों. दि. २३।७।५६.

कंकणरव करि साथ आपुल्या गतिमय तन्मयतेला.
या सुखसागरिं लीन होउं ये विसरूं मृण्मयतेला.
म्हणुनी राणी तुज विज्ञापन देइ निरोप दिव्याला.
अंधाराच्या धारामधिं या चिंब होउ दे मला.

●

# तूं गमशि मूर्तसौंदर्य.

तूं गमशि मूर्त सौंदर्य विश्वमोहिनी,
गे विहर सर्वदा अशी जनांत मनांत.
लय-रंग-रूप-रेखांचा घडला मेळ!
जणुं शिल्प सजीवच कुण्या कलवंताचें.
तव अंगराग दे मधुगंधी सन्देश,
जास्वंदी भूषा खुलते गौरतनूला;
डोकावें तींतूनि तव यौवन कोवळें;
जणु आंबेमोहर नव्या पालवींमधुनी.
स्मित अस्फुट आणिक गुंजत जिवणीभंवती,
तांबूस ढगांचा गालावरती खेळ.
स्वर्णांत जडविले नीळ तुझे ते डोळे;
केतकीस आलीं गोकर्णीचीं फुलें.
नयनांत वसतसे वर्षा, हृदयीं वसंत;
अन् शरत्कान्ति तव तनुवर ओथंबली.
झंकरली वीणा नंदनवनिं कोणाची?
रागिणीच ये ती लंघुन व्योम सुनील.
चिरनिद्रेमधुनी जाग्रत हो सुंदरता;
कीं प्रतिसृष्ट्याचें स्वप्न सचेतन झालें.

शुभशोभन चरणस्पर्श होत धरणीस;
हो आसमन्त रोमांचित त्या स्पर्शानें.
शतनेत्र खिळति पद शतावधि अडखळती,
चंद्रिकेपरी जा ग्रहगोला चुकवीत.
तव दर्शन निववी अंतर्दाह क्षणांत.
तव वीक्षण जीववी मनिंच्या अमित सुखाशा.
तूं गमशि मूर्त सौंदर्य विश्वमोहिनी !
गे विहर सर्वदा अशी जनांत मनांत !!

●

# कशानं मन झालं आतूर ?

नवलपरीचे नवलाईचे कुठून आले सूर,
कशानं मन झालं आतूर ?
कुणा धुंडिते नजर अगोचर,
श्रवणीं रिघतीं मधु मंजु स्वर,
दरवळ कसला व्यापी अंतर ?
मुकुलित काया अणूअणूला ये नवतीचा नूर.
सांध्यछवी दे निशा हुसकुनी
विसावली तव गालीं येउनी.
चंद्र पुनेचा त्वन्नयनांतुनी
मुक्तहस्त उधळितो जगावर मणिमोत्यांचा चूर.
रसकल्लोळीं मीलनगायन.
रंगछटा कां तरंगदर्शन ?
विभ्रमरूपें तुषारनर्तन.
फेसाळत खळखळतो हृदयीं अथांग अमृतपूर.
तव नयनांच्या खोप्यामधुनी
करीत किलबिल गुंजत गाणीं
स्वप्नविहंगम पंख पसरुनी
कां तारांशीं हितगुज करण्या भुर्र उडाले दूर ?

गुणगुणशी जें भावगीत नित
प्रगट करी रम्यार्थ मनोगत
झळकें वदनीं सोनेरी स्मित
अवमानुनि तुज, गुपित खुले करि झाले फंदफितूर.

राजस कुणी राजहंस सुंदर
लड मोत्यांची नेवो सत्वर
कुणी पारखी चतुर मनोहर
किसलयकोमल सोनसळीला घेउन जावो भूर !

●

# नर्तकी

रुणुझुणुं दे नूपूर–नर्तकी–रुणुझुणुं दे नूपूर.

कटाक्ष भेदक कांचनकाया,
सुरेल गीतें, अभिनयमाया
काय निर्मिशी न्यारी दुनिया
रुणझुणनी नूपूर ?

गीतसुधेचें अविरत सिंचन.
शिणली तनु हो पुलकित पावन.
कोमल कंपित अधरोष्ठांतुन
छेड छेड मधु सूर

नाचनाचवुन भुंवया रेखिव
लवलवुं दे लव तनुलतिका तव.
विस्मरेन क्षण जीवन पार्थिव
भवाब्धि अन् भेसूर.

नादलहरि जणुं अवखळ नारी
बिलगति येउन हृदयकिनारीं
स्पर्श सुखद हळुवार निवारी
अन्तरिंची हुरहूर.

उभयकरीं घेउन दिव्यांबर
घे गिरकी घे फेर मनोहर.
झेंपावत जणुं जलपृष्ठांवर
खगवर क्रीडातुर.

हुंकारत मी कणाकणांतुन
होत हिरण्मय अवघा क्षणक्षण.
गगनिं जेवि पाहुन शामलघन
नाचत मत्त मयूर.

नाचनाच बेभान होउनी
रोमरोम जाउं दे थरारुनि
दाव तुझ्या मदधुंद लोचनीं
स्वप्नें कांही मधूर

●

## दीसभराच्या उन्हानं

दीसभराच्या उन्हानं
अंग नभाचे रापले.
देहावरी लाल लाल
वळ आगीचे उठले.

दीसभराच्या उन्हानं
शिणे धरणीमाउली.
जळाशयांच्या डोळ्यांनीं
धुंडी नभाची साउली.

दीसभराच्या उन्हानं
हूड वारा झाला त्रस्त.
रागेजुनी घाली धिंगा
दूर बाभळवनांत.

दीसभराच्या उन्हानं
वाट थकली भागली.
सांगे विजेच्या खांबांना
कर्मकहाणी आपली.

दीसभराच्या उन्हानं
गुरेंपांखरें कावलीं.
गोठ्याघरट्यांत आतां
सुखासाठी विसावलीं.

दीसभराच्या उन्हानं
जड पापण्या डोळ्यांना.
पाकळ्यांचा भार शिरीं
कळ लागली देठांना.

दीसभराच्या उन्हानं
गेलों आंबूनचिंबून.
येई हुरूप पायाना
घर दिसतां लांबून.

●

# सखि, गीत मधुर तूं ऐकविलें.

सखि, गीत मधुर तूं ऐकविलें.
विमलभाव हृदीं जागविलें ?
अर्धोन्मीलित कळ्याफुलांवर
दंवबिन्दु जैं ठिबकति मृदुतर
तेवि माझिया हृत्कुसुमांवर
मृदुल भाव तूं सिंचियले.

तृषार्त व्याकुळ निदाघ धरणी
बरसति मृगसरि पुलकित अवनी
तळमळत्या माझिया जीवनीं.
अमृतघट तूं अर्पियले

मेघखंड जैं वायुलहरिवर
तरतो फिरतो गगनीं वरवर;
तेवि सखी, तव गानलहरीवर
विश्व नवें मीं पाहियलें.

तुझ्या लोचनीं सुभावदर्शन,
तुझ्या गायनीं यौवनजीवन,
अन् आलापीं प्रेमनिरूपण
शिव सुंदर गे अवतले.

●

८०९१

# स्वागत

सुवर्णवर्णी उषे ! तूं न कधिं ललाट हे चुंबिलें
पौर्णिमे न तूं रजतरसानें अभ्यंतर न्हाणिले
नभा उदारा, कुरवाळुनि तूं नच मस्तक हुंगिलें
छायेस्तव ढग माथ्यावरती, कधीं न रेंगाळले.
स्वरधारांनीं कधिं न शिंपिली, ही अंगण-ओसरी.
मधुगंधाची कधीं न झाली, घरावरुन फेरी.
म्हणुन खिन्न मी, आणि अचानक आलिस तूं मोहिनी
अवसेच्या घरिं पुनव कशी ये, अनाहूत पाहुणी !
रंग उषेचे चुंबुन झाले ओठ तुझे लाल.
पिउन चांदणें नेत्र धुंद तव विणिति इंद्र-जाल.
कंकण गाती मधुगीति अन् गंधवती तूं स्वतां
विस्मित मी तुज बघुन इथें अशी, केवि करू स्वागता ?

●

# हुरहुर

किति कळ्या पाकळ्या आणि कोंवळी नवती
शिरिं घेउन मिरविती दवबिंदूंचे मोती !
परि एक टोंचणी नित्य उरीं बोचते,
कीं येइल झंझावात पिसाटावाणी;
घेईल हिरावुनि त्यांचीं अहेवलेणीं
ये टिचार मोहर, लदलदली आम्बराई.
फिरविते कोकिळा दिशादिशांना द्वाही.
परि काहुर हृदयीं घालितसे थैमान;
कीं येइल काळाकभिन्न वारिद गगनीं
नी मोहर सारा जाइल जळुनी गळुनी !
मी निशिदिनिं श्रमुनी मळा एक शिंपला.
तो फुलला, फळला नवतेजानें नटला.
परि शल्य सलतसे एक नित्य अंतरीं,
कीं होइल अवचित गगनांतुनि हिमवृष्टि,
ही जाइल ध्वंसुनि सस्यश्यामला सृष्टि.
जाहली सखे जरि आणभाक प्रीतिची,
जाहली सखे जरि देवघेव हृदयांची,
हुरहूर निरन्तर श्रान्त करितसे चित्त,
कीं अवचित येइल शर अज्ञातामधुनी
अन् प्रीतपांखरूं टाकील गे विंधुनी.

●

# उपेक्षा

अभिसिंचित चंद्रिकासुधेच्या अशा सरींवर सरी
कां आलिस घेउनी लोचनीं शारदीय शर्वरी ?
आणि कधीं मिरवलीस लेवुन गालिं उषेची छवी,
दाविलेस कां हावभाव अति आर्जवी अन् लाघवी ?
ओठांमधली मणिमोत्यांची दौलत केलिस खुली.
दीन-पांखरू गुंतविलें या संमोहनजालीं.
ऐकवली कां भावनिर्भरा श्रवणसुभग वैखरी ?
कां आलिस घेउनी लोचनीं शारदीय शर्वरी ?
ओसंडत लावण्य निथळतें यौवन गात्रांतुनी.
पीयुष नच ती सुरा विखारी पाजिलीस भामिनी,
कामरूपिणी मदालसे तव मंथर चालीतुनी
भाव फुलांची शेज सुकोमल तुडविशि सौदामिनी
चटकचांदणी, सान्निध्याची चटक लावुनी मला,
शिलाखंड होण्यास लोटुनि दिलेस कां भूतला ?
दग्ध जाहले भाव सांडुनि राख तयांची आतां,
कालनदींमधी दिली झोकुनी स्मृति गताची वृथा !

●

# शांतिदेवतेस

ये येशिल तर शांतिदेवते, आज आमुच्या घरा,
लंघुनी क्षितिजाचा उंबरा,
वसंतापरी फुंकर घालुनि फुलवित ये परिसरा.

गहन-नील-लोचनीं तूझिया निर्धन गगनांतली
विमलता, विशालता बिंबली.
स्मित-किरणांचें इंद्रजाल गे, गुंफित रदनावली.

चंद्रकरांचें दुकूल अक्षर शुचिसुंदर भर्जरी
लेउनि येइ येइ सुंदरी,
स्नेहस्रोत वर्षित ज्योत्स्नायुत अश्विनरात्रीपरी'

समतेची स्वातंत्र्याची । ये लेउन बिरुदावली
न्यायाचीं अन् करुणेचीं । भूषणें मनोहर सजलीं.
अन् खुलुं दे मानवतेचा । शुभतिलक विशाल कपालीं.

तेजस्सरि वर्षवीत येई प्रकाशमयदेहिनी,
झळाळति कीं शतसौदामिनी.
उमलुं देत स्वप्नांच्या कलिका तुझ्या करस्पर्शनीं.

रक्तरंजिता रणचंडी मधुमत्त इथे नाचली,
तियेचीं पदचिन्हें उमटलीं.
विप्लवगीतस्वर निनादती अजून या भूतलीं.

लयनिबद्ध पदझंकृतींत तव विरूं दे या गीतिका
भयद अन् भीषण स्वरमालिका.
चरणस्पर्शें रजःकणांतुन बहरु देत वाटिका.
ये प्रज्ञेपरि घेवोनी । नवनवोन्मेष मोहिनी.
ये संज्ञेपरि दावाया । नितनूतन आशयसरणी.
चिरलक्षित चिरवांछित गे । ये श्रेय प्रेय होवोनी.
सांध्यघनांतिल सुवर्णसुषमा घेउनिया करतळीं
दुज्या करिं आशेची कुंचली
भविष्यफलकांवरी रेख ये अभिनव स्वप्नावली.
क्षण रिझवाया येउं नको गे, स्वप्नसुंदरीपरी
घेउनी क्षणभंगुर माधुरी.
अक्षयमीलनचित्रें रेखित काळपुरुष अंतरीं.
आज अणूंतिल अलकालंका सज्ज तुझ्या स्वागता
घेउनी त्रिगुणात्मक संहिता.
कृपाकटाक्षें पुनीत पावन करण्यास्तव ये अतां.
या मूर्ति-भंजनीं झाले । उध्वस्तच पीठ-किरीट
बंदिस्त श्रीस विहराया । उन्मुक्त स्वैर-सैराट.
सर्वंकष दिव्य दिसूं दे । तव राजसरूप विराट.
नव्या जगाची कोनशिला ये बसविण्यास देवते
भावघट त्वत्पदिं केले रिते .
सहर्ष युगवैखरी आज तुज स्तविते आवाहिते.

## कां वृथा अशा वल्गना ?

नच निबद्ध होती स्वैर तरल कल्पना;
त्या समूर्त करण्याच्या या—कां वृथा अशा वल्गना ?
ओतितो निखारे निदाघभानु वरी,
तनु होरपळे त्या अग्निशराच्या सरीं,
मधुसंध्यागीतें आळविशी तूं परी.
तीं देति न हृदयां लवहि शांति चेतना.
त्या रम्य भाविकालाच्या—कां वृथा अशा वल्गना ?
तूं मरीचिका कां रम्याद्‌भुत दाविशी ?
निष्पाप भाबडीं हरिणें पडतीं फशीं.
कां स्वप्नभूमि मधुमंगल ही उभविशी ?
तिजपाठिस लागुन काय लाभलें कुणा ?
तें ध्येय प्रेय तें माझें—कां वृथा अशा वल्गना ?
तूं भूतकालचीं मढीं कवळिशी उरीं,
अन् भविष्य उज्ज्वल काय कलाचातुरी !
बघ वर्तमान त्यासवें झुंज सत्वरी.
अन् देहावरती तुझ्या दिसूं दे खुणा.
तोंवरी तुझ्या शौर्याच्या—कां वृथा अशा वल्गना ?

तव माता विनता मरणोन्मुख पंजरीं.
तूं वैनतेय जा झेंपावत अंबरीं,
तिज मुक्त कराया अमृत देवाघरीं,
जा आण कलश ही तुझी तपस्साधना.
तव धृति, कृति, शौर्याच्या--तोंवरी व्यर्थ वल्गना !

•

## यें नववर्षा

यें नववर्षा,  येई प्राचीपरी
घेऊनिया करीं  घट अरुणाचा,
प्रकाशधारांनी  करी सुस्नात
कोन कोन या  वसुंधरेचा.

येई नववर्षा,  अमेपरी तूं,
अंधाराच्या धारा  ओतीत खालती,
मात्र तिच्यापरी  फुटूं देत उरीं
लक्ष नक्षत्रांचें  प्रकाशाचे कोंभ.

येई नव वर्षा  होऊनिया वर्षा,
घालुनिया गळा  इंद्रधनूचे
  स्वप्न सप्तरंगी;
धरतीच्या या  जळत्या अधरीं
टेकव आपुले  सजल ओठ.

येई नववर्षा,  वसंत होउनी
दळांदळांतून  साकळूं दे रस.
कळ्याफुलांतून  भरू दे सौरभ.
जळथळाचे  सारे अंगराग
रंग-रस-गंध  रूपमती ही
होउं दे  पृथिवी.

नवजीवनाच्या नवसर्जनाच्या
ईषदारुण पल्लव पताका
फडकूं देत वृक्षवेलीवरी.

असले कांही दाखवी लाघव
आर्द्र मार्दव हे नववर्षा!
हे नववर्षा, गतवर्षाच्या
कळीचें फूल तूं, बीजकोशामधिं
फळाची प्रेरणा.

होऊन ये तूं, नववधूचें
विश्वस्त स्मित.

होऊन ये तूं, माळावरल्या
पाण्याच्या शिरेचे सखोल स्पंदन.

होऊन ये तूं, निशेनें दिलेल्या
सुंदर उषेचें रम्य आश्वासन.

नितळ, निर्मळ दंवाच्या दर्पणीं
बिंबलेले विश्व सुरंगमय तूं!
युगायुगांतील संतमहात्म्यांचे
मंगलमय ते आशीर्वादच
घेऊन ये तूं हे नववर्षा.

पृथ्वीवर पाउल न ठरे, हृदयिं उभारी,
पसरुनी पंख मी घे आनील भरारी.
वाटेंत भेटले ढग गंहिवरुनी वदले,
‘ विश्रमलों व्यर्थाचि या असीम नीलांत
परतलों कराया धरित्रीस सुस्नात.’

जैं कळ्याफुलांना खुलवि सकाळझुळूक,
केलेस बोलके भाव हृदींचे मूक,
डंवरली तनू उत्फुल्ल, होत मानस.
अन् अन्य कुणाचे म्हणशी कर पूजन
तें घडे न देवि, होऊं केंवि कृतघ्न ?

दर्शनें जिच्या ये धुमाळून सागर,
वीक्षणें जिच्या ये उधाणून अन्तर,
ती मावळली चांद्रिका, सिंधु निस्पन्द.
निस्तब्ध नितळ या सागरहृदयांतली
या तारांनी छवि हुडका आपापली.

रोखून काजळी डोळे मोहन राणी,
जळवंतीची त्या दाविशि किमयाकरणी
ते गहिरे पाणी अधिक वाढवी प्यास
भरभरून प्यालों, सरे न ही जळजळ.
गे, रितें हृदय अन् रितीच बघ ओंजळ.

उतरली धरेवर अवचित सर वळवाची.
विरघळलीं स्वप्नें निद्रित मृद्‌गंधाची.
तों पिशापरी हो उन्मन भटके सैरा.
मम स्वप्निल जीवनीं तशीच आलिस राणी,
उधळिलास मधुपट भ्रमतों वेड्यावाणी.

●

# खानावळींतलें अन्न

खानावळींतलें अन्न  खाऊं लागलें मजला.
चहा बिडी हेही सारे  पिऊं लागले मजला.
लाल जिभांनी दुपार  चाटूं लागली मजला.
चिंता आजची उद्याची  शोषूं लागली मजला.
मी अन्नाचें अन्न झालों.  मी पेयाचें पेय झालों.
चटावल्याचें चाटण,  शोषकांचें शोषण मी.
खाद्य पेय चोष्य लेह्य  मीच अवघ्यांचे झालों
तुम्हां  सांगण्यापुरता  आहे अजून उरलों.

●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकमत.
अनुक्रम 29268 दि: 2105
क्रमांक 93452 नों: दि: 23/7/54

# पारध

आज कुणाची पारध करण्या चाललीस भिल्लिणी :
कुरळ केश कुरवाळिति आनन
विरल वसनिं लवथवलें यौवन,
नितळ कांति तळपते विलोभन,
सर्वे आयुधें घेउनिया हीं कोणिकडे टेहळणी ? ॥१॥

मनोहारि तव विभ्रम-विलसित,
तनमन यौवनसुरासुरंजित,
केशवेष रेशमी सुगंधित,
घुटमळुनी भोंवतीं पवन करि गंधमिषें मनधरणी. ॥२॥

नयनामधल्या निळ्या सागरीं,
उचंबळति उच्छृंखल लहरी,
गुदमरती आंदोलति त्यावरी,
पंचविशींतिल हृदयें कवळीं विद्ध विकल होउनी. ॥३॥

मंत्रबळें वा पुंगि वाजवुनि,
टाकिल कुणी तुज धरणिस खिळवुनि
ओठांमधलें वीख प्राशुनी
करील तुज निस्त्राण निरन्तर मदोन्मत्त नागिणी ॥४॥

●

# तूं मनोज्ञ बाला

तूं मनोज्ञ बाला
उधळित उद्धारक स्मित, भेदित दिक्काला.
साडीची मृदु सळसळ,
कंकणरव तूं मंजुळ,
काय सांध्यतेज तरळ,
निघे विहरण्याला.
सुहृदांचे तूं हितगुज,
युगुलांची तूं कुजबुज,
कीं विधि छेडुनि अलगुज,
निर्मित स्वरमाला.
रमणीचा तूं मुरका,
नववधुची हुरहुर कां ?
कां रुसवा तूं लटका
अनुरंजनशीला ?
तूं वसंतवात धुंद
कोमल अनुरागबंध,
कीं मादक पुष्पगंध
सम्मीलित केला !
शिशुवदनीची शुचिता,
दृक्शरिची भेदकता,

मृदुता अन् मोहकता,
संवेदन-शीला !

प्रणयाकुल हृद्स्पंदन,
ओठांचे लव कंपन;
मनोमूर्तिचें चिंतन,
मधुर एक चाळा.

कीं मुनि करण्यास विद्ध ?
कुसुमायुद्ध होत सिद्ध;
शर त्यांतिल मंत्रबद्ध
दृग्गोचर झाला ?

कविहृदिं जे भाव मृदुल,
वर्णातित उच्छृंखल,
ते समूर्त होत सकल
मनें जिंकण्याला ?

●

## आज तुझ्या संगतींत राणी

निखळ जळाची मंजुळ खळखळ,
विविधरंगिं विनटलें भुवन नभ,
दळादळांतुनि सांकळले रस,
कळ्यांफुलांतुनी भरला सौरभ.
सखे तुझी जवळीक शुभंकर
म्हणुनी अंतर्विश्व धवळलें.
आज तुझ्या संगतींत राणी
राग रंग रस गंध उमगलें.
वृक्षवेलिचें निगूढ हितगुज,
मुखर मौन गिरिग्रहगोलांचें,
लाटांचें वा अखंड नर्तन,
स्पंदन वर्षातिल मेघांचें,
तेजोमय दृक्स्पर्शें तुझिया
विश्वांतिल लावण्य उमललें.
आज तुझ्या संगतींत राणी
अर्थ भाव गतिस्थितींत भरले.
उजळ जाहल्या ललाट रेषा.
नियतिनियंता हो करुणाघन.

तव रूपें बोलला मजवरी.
कणांकणांतुन स्फुरलें जीवन.

वरदानापरि येउनिया तूं
मनोमंदिरीं दीप उजळले.

आज तुझ्या संगतींत राणी
सकल साधना संचित फळलें.

भावबळें अर्पुनि कारागिरी
उभारिलीं मी रम्य मंदिरें.

इच्छाभ्रमणीं निरत होउनि,
विनाशिलीं तीं सुवर्ण शिखरें.

भंजक मी तूं दावियलें मज
भग्नशिलांतिल भावनिरूपण.

आज तुझ्या संगतींत राणी
माझें मज आकळलें मीपण.

●

# चल ये राणी

चल ये राणी, रात चांदणी, मंगलमय आरास
धुंद दिशा अन् रम्य वनश्री, अवतरला मधुमास.

चंद्र आपुल्या लक्ष करांनीं
कवळित वसुधेला आलिंगनीं,
ही न झुळुक, हे या वसुधेचे गुदमरलेले श्वास.

विशाल राकट कुशींत गिरीच्या,
खळखळत्या भावना हृदींच्या,
कथीत गे निर्झरिणी राणी विसावली सोल्लास.

तटस्थ तारे निश्चल तरुवर,
स्तब्ध रान निःशब्द चराचर,
गूढ मोहिनी नीरवतेंतुन व्यापितसे विश्वास.

दोन जिवांची जुळणी–मिळणी,
दो हृदयांची एक कहाणी,
दोन जगांचें द्वैत जिवलगे क्षण जावों विलयास.

मधुक्षणांची याच शिदोरी
घेउन करणें अतां मुशाफरी.
क्षणामाजिं या भरूं साजणी युगायुगांची आस.

●

# रुबाया

ये पहाट, सुटला थंड चावरा वारा,
काकडली धरणी, हो दुःसह्य शहारा.
दृग खुळे बावळे उगवतीस धावलें
चैतन्यघन प्रभो, तुज द्यायास उबारा

नाशवंत काया अन् आत्मा अविनाशी,
संतृप्त जिवांची ही केवल मखलाशी.
देहधर्म चुकेल कुणा? जळो वादंग!
मज हवा रेशमी मृदुल देह करपाशीं!

मी मेघ होउनी ल्यालों सुवर्णरंग,
दंवबिंदुचुंबनीं रविकर बनुनी दंग
कधिं चंद्रमिषें मी आलिंगी कुमुदिनी,
किति रती भोगिल्या होउन मदन अनंग!

जें गूज गुंजलें तुझ्या चुटुक ओठांत,
जे राग रंगले तुझ्या मदिर नयनांत,
अंगांगीं भिनले बनून जे विषधार,
ते वदतां मी, कां करिशि उद्याची बात?

रे भोग भोगुनी सरति न मजला ठावें.
हें काय लागतें कुणी कुणा शिकवावें ?
तूं विरक्तीवरी असाशि अन् अनुरक्त
भोगाशि त्याग मग तुजला काय म्हणावें ?

हें दुरून बघणें हंसणें आतां पुरें!
त्यामधीं न आतां गंमत कांहीं उरे.
तनुलतेवरी तव सुमनांचा संसार
रसगंधसेवना आसुसलों मी मधुरे!

भोगिली अहिल्या व्यभिचारी इंद्रानें
गुरुपत्नी भोगिली बदफैली चंद्रानें.
उ:शाप जोंवरीं मिळती पापात्म्यांना
शापरूप तोंवरि आहे इथलें जिणें!

सखि सहज मुरडुनी बघशी निमिषार्धांत
हो शुक्लाष्टमिचा चंद्रोदय रस्त्यांत
होईल पुनव वाटलें होशि मार्गस्थ
अष्टमीमागुनी अवस जीव उद्भ्रांत!

●

# सरो न ही मधुरात

सरो न ही मधुरात साजणी

तरुतळिं निजल्या छाया निश्चल.
वायु आपुली थांबवि जागल.
डोकावति बुरख्यांतुनि धूमिल
गगनांतिल नवलाख मुखरणी.

रूप रुपेरी ल्याली दुनिया,
ही तर आपुली मोहनमाया
करी सचेतन स्थिरचरासि या
निजतेजाचीं घालुनि लेणीं.

हितगुज आपुलें कोमल मंगल,
सोसवे न त्या दिवसांची झळ.
व्यवहाराची साहवे न कळ,
रुततिल खुपतिल अक्षरश्रेणी

तव रूपांपरी तें नितनूतन,
त्वन्नयनापरि रम्य भावघन,
प्रीतीपरि आपुल्या चिरन्तन
असो म्हणुन ही अनन्त रजनी.

भावगहन निःशब्द निर्भरा
कथा आपुल्या परिसुनि रुचिरा
भान हरपतिल शशांक तारा
मावळायचे जातिल विसरुनि.

●

## निर्वासित

पायपथाच्या फरसबंदिवर
एक कडेला कोपऱ्यांत कुणि
सिंधुप्रदेशांतिल निर्वासित
बसला छोटें दुकान थाटुनि.
गंजी मोजे रुमाल यांचा
विस्कटलेला पुढें ढिगारा.
त्याच्या उस्कटल्या संसारा
या चिंध्यांचा असे आसरा
पाठीवर आभाळ फाटलें
लाज कशाची कुणि राखावी?
घोर कहारी दुपार पोटीं
कळंजला कोथळा तापवी.
निढळावरल्या चऱ्यांत देई
भूतकाळ अंतिचे आंचके !
चौकोनी चिर्गुटांतुनि या
भविष्य अपुलें सोडि बोचकें !
वर्तमान जखमी श्वानापरि
रक्त आपुलें बसला चाटित.
आम्हिच आमुचें भक्ष्य बनावें
नियम येथला असे अबाधित.

नियम येथला अजुनि अबाधित
अम्हीच आम्हाला खावें प्यावें
सूर सुरांमधि मिळवुनि आणिक
संस्कृतिचे गावेत गोडवे !
आली सिंधु पंचनद्यांसह
गोदाकृष्णेला भेटाया
ज्ञानेशाची अमृतवाणी
तुकयाचा गाथा ऐकाया.
या गाथ्याच्या गंगोत्रीमधिं
रक्तांश्रूंची विझवा आग
माळपठारांवरी येथल्या
भवितव्याला आणा जाग.
महामहिम त्या पुण्यात्म्यांची
वास्तु वास्तुंतुन इथें वसाहत
तेही होते त्यक्त बहिष्कृत
तेही होते हो निर्वासित
दो बाहुमधिं परी कवळिले
त्यांनी अवघे मानवप्राणी
भूतांतिल भगवंत बाहिला
शिणवुन आपुली अमृतवाणी !

●

# अंधाराला खडे मारिती

अंधाराला खडे मारिती,
        दिवाळींतल्या मिणमिण पणत्या.
अवकाशांतुन गुरगुरतो तो
        गिळूं पाहतो ज्योति जागत्या.
कीं बांधाव्या त्याच्या मुसक्या,
        दोर प्रकाशाचे अधांतरीं
झोकिति फेकती वेंघती न ते —
        आदळती अन् पुन्हां खालती.
अशिव शक्तिनीं शिवप्रभूचा
        नीळकंठ वा असे विंधिला
विषमय काळया रक्ताचे त्या
        वाहत येती पाट भूतला,
कणाकणानें क्षणाक्षणानें
        विखारांत त्या बुडते धरणी !
वीरभद्र घायाळ विद्ध हो
        कालकूट हें पचवावें कुणि ?
जटेंतली तीर्थंकर गंगा
        विधवेपरि स्फुंदते क्रंदते
बसे चंद्रिका अवस नेसुनी
        विव्हळुनी अन् काय बोलते ?

जखम शिवाची कुणि बांधा हो !
        रक्तपात हा कुणि थांबवा
तनमन जीवन अर्पुनि सारे
        शिवशक्तीला कुणि वांचवा !
कोटि चंद्र या, कोटि सूर्य या
        काळोखाचीं पिलें वधाया.
मायावी रूपांत भटकती
        त्यांच्या काया, त्यांच्या छाया !
तमांत स्फुरते प्रकाशवांछा.
        होते तममय आधी सारे.
"प्रकाश होवो" प्रभू बोलला.
        प्रकाशमय अन् झाले सारे.
कुठवर पिचक्या पणत्यांनीं या
        करावयाचें तम-विध्वंसन
पुटपुटल्या त्या स्वतःशींच अन्
        मिटतां आपुले ज्योतिर्लोचन,
"तमांत अमुचा जन्म आणखी, तमांत हो निर्वाण,
तमात अमुचा जन्म आणखी, तमांत हो निर्वाण."

# नगरांतिल राजपथा

नगरांतिल राजपथा,–तूं असाच भ्रमत रहा.
तटबंदीवरती अन् –धडक व्यर्थ देत रहा.
पडली काळी ठिक्कर करपुनि काया उन्हांत,
घाम डांबरी फुटुनी डबडबतो देह तुझा.
रोवित रबरी टांचा धांवति उरि चक्र-चरण,
मूढ–गति तेही ! मात्र करिति क्षतांकित तुजला.
आंबट ओल्या जखमा सुकति वाहति फिरुनी.
तरि भ्रमणें हें असेंच नगरावर्तांत सख्या.
दो बाजुस वीजखांब रक्षक अेकाक्ष उभे
रोखुन भोकरडोळे करिती पहारा तुजवर.
तारांचे तुजभंवती विणिति विजेरी जाळे.
राजबंदि असशि जणूं म्हणुन दक्षता इतुकी ?

रेडियो नि चौकांतुन कोकलतो रात्रंदिन
नित्य 'पियाबालम' चीं गाई गुळमट गाणीं.
चघळिति तो चोथा, हो चोथ्यापरि हें जीवन
रसवत्ता त्यांत कुठे वा अर्थाची गुरुता ?
वसति न मृतकाय इथे, हाय मृतात्मे वसती
येथ स्वयें शूलावर चढते शिवसुंदरता !

इथलें आकाश मलिन आणि दिशा दुर्मुखल्या.
वायु बियाणें विषमय पेरित निज निश्वासें.
जावें जींवर लोभुनि वा जावें वेडावुनि
वेधवती स्वप्नसुभग सुंदरता येथ कुठें ?

उगवे रवि कुठुनि ? अहो मावळतो आणि कुठें ?
रंगपंचमी केव्हां खेळति संध्या नि उषा ?
शरदांतिल शाद्वलभू नटवा प्रियकर वसन्त,
जलभारें अवघडल्या वर्षेचें अलसगमन,
हेमन्तीं तृप्त धरा विरही संन्यस्त शिशिर,
हन्त ! इथें ग्रीष्मांतिल मृगजळही ना गवसें !
चंद्र लेववूं बघतो चंदेरी रश्मिवसन,
वस्त्र चांदण्याचें तें पेटविती वीथिदीप.
रे छळणा ही निमूट सहणें तुजला अशीच
गहिंवर दाबून उरीं भ्रमणें अन् हें असेंच
मर्त्य असें मानव मी मेलों म्हणजे सुटलों
चिरंजीव तूं सलते शल्य हेंच राजपथा

●

# सखी माझें मनोगत

सखी, माझें मनोगत अडे, दडे ओठांआड
कसें कथायाचें तुज रस दळांत गोठले ?
गीत घुमें गाभाऱ्यांत माझें हरपवी भान,
तुज ऐकवावें तरी सूर कंठांत आटले.
रात्रीं आकाश बोलतें लक्ष नक्षत्र शब्दांनी,
दिवसाच्या प्रकाशांत त्याचें मानस विटलें !
घेत सूर्याचा मागोवा फिरे वेडें सूर्यफूल.
आणि वायु गंधवेडा रस गंधाच्या शोधांत.
वसंताची ये झुळूक रुक्ष वृक्षां बिलगली.
अग्निवर्ण पर्णी जणूं त्याचें वैराग्य पेटलें.
चंद्र झुरे ढगाआड, पानाआड झुरे कळी.
पापणीच्या आड डोळा बाहुलीचें मन उलें.
कधीं अर्धेमुर्धे हंसूं कधींमधीं वाटभेट.
जुटीतुटींत असेच दीसमास गे लोटले.
धूप स्वयें जळूनिया निर्मी सुगंधाचें लेणें.
धन्य मानील तुजला जरी त्यावेसें वाटलें.

●

## मास्तरीण

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ८०९३

दीसभर वळूनिया थवे पर्कऱ्या पोरींचे
पाय अपाप वळाले घरीं यावयास तुझे.
रंग-रोगण मुखीचें नेलें कुणी सावडून
डाग जळके राहिले गेलें यौवन जळून.
काळे शार दोन केंड भुवयांना भिडलेले.
पाणी डोळ्यांचे आंतलें तुंबलेलें सडलेलें.
माना टाकल्या स्तनांनी बंद काचोळीचे ढिले.
छत्री, मंजुषा वाहून हात रोड कंटाळले.
तूंच कुलूप काढिलें, तूंच पेटविली चूल.
क्षण दिली थकव्याला चहा पिऊनिया हूल.
तुझ्या पारोशा साडीचा लेळे कोपऱ्यांत बोळा
बोका अनुभवी त्यांत सुखनिद्रेचा सोहळा
गुंतोळाच्या गुंडोळीला साथ लाभली झाडुची.
दोस्ती पोरींच्या वह्यांशीं छान जमे आंकड्यांची.
दांत पडलेली फणी पाही मुखडा दर्पणीं.
तोंच यौवनाचा साक्षी गेला पार विथरुनी.

झुरळाच्या मृतदेहा खांदा देऊन निष्काम
थवा मुंग्यांचा गर्जला 'राम बोलो भाई राम,'
आली रात्र हडळीण; तुझी शांतिसंहारिणी
आली दांत विचकीत आली केंश पिंजारुनी.
शेजारच्या खोलीमध्यें रात्र घालिते धिंगाणा
तुझ्या उशीने घेतला एक अर्वाच्य उखाणा !

●

# आली आभाळाला खार

आली आभाळाला खार

हृदयांवरि अन् रितेपणाचा दुःसह दुर्वह भार,
जड जंगम व्यापून शून्यता उरे अथांग अपार.

कूर्मांपरि संकोचुनि काया हो चैतन्य पसार.
अचेत हो ब्रह्मांड, कुठेहि न जीवन साक्षात्कार.

चलन वलन थांबलें जगाचें, हो असार संसार.
मृतांपरी हें जीवन भासें व्यर्थ भुईला भार!

मात्र वडाच्या शेंड्यावरूनी शिळक भरितसे घार.
जाय नभाचें काळिज विंधुन आवाजाची धार.
पाचोळ्यामधिं सळसळ करिते मधुनिच अचपळ खार.
गाभाऱ्यांमधि फडफडति अन् पाकोळ्या अनिवार.

अभद्र आरव व्यथित विकल करि कुठें आतां आधार?
चिघोर पोरांचा रस्त्यामधिं करी अखंड पुकार.
"वाऱ्याची आई मेली वारऽ सुटऽना
वाऱ्याची आई मेली वारऽ सुटऽना"

●

# मेनका

मांडिलें तप
उग्र, प्रखर, दारुण, विराट
विश्वामित्रानें,
वसुंधरेच्या शैलकुहरीं.
नव्या युगाच्या नवनिर्मितीच्या,
नव्या जगाच्या, नवसर्जनाच्या,
नवमानवाच्या, नवसंभूतिच्या,
अदम्य, उद्दाम, महदाकांक्षा घालिती थैमान त्याच्या अंतरीं.
परी तपातेंपं,
वस्तुजात सारें होत भस्मसात.
पोळला मार्तंड.
हिमालयालाहि फुटला घाम.
सस्यशामला धरणीमाताहि गेली आहळून, होरपळून.
सरले वृक्षांचें स्वैर, अनिर्बंध नभारोहण.
सरले नद्यांचें श्रवण कोमल अमृतगान.
सरलें वेलींचें विभ्रम नर्तन.

सरलें वायुचें शीतल सगंध परिरंभण.
सरलें खगांचें कलकूजन.
सरलें सारें, विरलें सारें, उरलें मात्र
वसुंधरेचें तप्त वैरागर !
वठल्या झाडांचे हाडांचे सांपळे !!
आणि मुनींद्र...
कोंडून इंद्रियें, हृदयाआंत, करी साधना.
नव्या जगाच्या स्वर्णजर्तारी स्वप्नसृष्टींत,
झाला रममाण.
हवेंत अनंत उठले इमले.
दर्शनें तयाच्या झाला वेडापिसा हेकट आग्रही.
तोडून साऱ्या तारा वीणेच्या
वाजवूं पाहतो गत अभिनव.
पाकळी पाकळी करून विलग,
पुनरपि त्याचें करूं पाहतोहे पुष्प दळदार;
हें केवि घडे ?
मरण-मुक्तिचा मार्ग शोधतांना
ओढवलें मात्र मरण जन्माचें !



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वक्मत.
अनुक्रम 29268 वि:
क्रमांक 9322 नों: दि: 23/7/58

पडला इरेस.

—आणि पुनःपुन्हा चाळवीतसे स्मरणमणि निज प्रतिज्ञेचे.

'अभिनव विश्व नवजीवन प्रतिज्ञोत्तरें करीन निर्माण !'

ऐकून प्रतिज्ञा—

भयभीत नर, भयभीत सुर, भयभीत खग, भयभीत मृग.

भयभीत तारे, भयभीत वारे,

सारें चराचर झालें भयाकुल.

करिती आक्रोश, करिती प्रार्थना.

एक मुनीच्या लहरीखातर भूमंडल हें पावतें विनाश.

'त्राहि भगवान् !' 'त्राहि भगवान् !' 'त्वमेव शरणं'

'त्वमेव शरणं !' उठले ध्वनि.

देवादिकांना पडे विवंचना

कुठल्या उपायें वळवावें मन मुनिवर्यांचें ?

श्रद्धाबुद्धीचे पांगुळले पाय.

सारे मंत्रतंत्र झाले निष्प्रभ.

हतबल शस्त्र, हतबल अस्त्र,

वेदवेदांत, तत्त्व तर्क न्याय हेहि अपुरे.

आहे एकाचि मोहिनीमंत्र,

करावी योजना सौंदर्यशक्तिची रूपराणीची या कार्यास्तव.

दिधली आज्ञा देवी मेनकेला सुरेश्वरानें.

आज्ञापिले सारे ग्रहखगोल नभनिवासी –

'तुम्ही मेनकेचे व्हावे सहकारी.'

शिरसामान्य मानून आज्ञा निघाली मेनका.

आकाशगंगेच्या चंदेरी पाण्यांत केलें सचैल तैलाभ्यंगस्नान.

रुपेरी वाळूंत उभविलें एक भव्य आरस्पानी प्रसाधनपीठ,

साज शिणगार करण्यासाठीं.

स्वयं चंद्रमा जाहला दर्पण.

उषा आणि संध्या झाल्या ओळगण्या शृंगारसख्या.

आणिली संध्येनें येतांना खुडून निळवंतीचीं नक्षत्रफुलें.

चिरप्रफुल्ल, अक्षयसुगंधी.

आणि उषा ये घेऊन सवें ओटींत आपुल्या

हृदय रवीचें चैतन्यदायी.

दिली शुक्रानें चांदण्याची उटी शीत शुभ्रगौर.

दिली मंगळानें निजारुणद्युति.

झाला अंगराग, कपोलरंजन ओष्ठविलेपन.

व्याधाची चांदणी बसली दडून लोललोचनीं.

ध्रुवानें दिला ध्रुवनिश्चय.

आणि शनैः शनैः शनिमहाराज शिरले राशींत विश्वामित्राच्या.

एकवटले सारे खगोल बंधुभावांन, एक भूगोलाच्या रक्षणासाठीं.

व्योमनदीच्या मृदुल पुलिनीं प्रसाधनाची चालली साधना
नंदनवनांत यक्ष-किन्नरांनीं आळविलेल्या स्वरालापांना
दे सरूपता देवदेवेंद्र
त्या स्वरतंतूंचें विणलें वस्त्र गर्द रेशमी, नर्म, मुलायम.

दिसते मेनका
देवी शारदेच्या अनाद्यनंत वीणाझंकारांनीं अवगुंठिलेल्या-
मेदिनी परी.

पीन उरोजाचा उन्नत उभार,
असह्य तो भार, बंद काचोळीचे कांचलें, रुतलें.
स्कंधप्रदेशीं क्षण विसावून झेपावले खाली,
विपुल विमुक्त, कृष्ण कुरल, अलक-कलाप घेत आलाप,
काळी यमुना ही अवतरताहे कुणां पतितांच्या उद्धारास्तव ?
कीं ग्रीष्मतप्त धरेस चुंबाया सघन गगन लवले वांकले ?

बद्ध पापण्यांच्या पिंजऱ्यामधीं नयनविहंग
झाले मोकळे !
लंघून सीमा काजळरेषेची झेंपावले खालीं,
घेण्यास्तव ठाव, वसुंधरेचा, मुनिहृदयाचा !
निघाली मेनका– !
तिचे लयबद्ध, ललितमत्त, नूपुरान्वित, पदविन्यास,
अक्षर अमर प्रणयगीताचें करीत चाललें स्वरलेखन.
झळके वदनीं नवोढेचें स्मित—
मुग्ध, अर्धस्फुट, चंचल चोरटें, आर्द्र अरुवार.
जणूं बीजेचें चांदणें अस्फुट, गूढ गोरटें स्निग्ध, सुकुमार.
वसंत-सेनानी करितो पुकार,
राग रस गंध रूप स्वर रंग, ही वसंतसेना करी जयकार,
मदनमंत्रि दे ललकार,
"अनंतयौवना त्रिलोकसुंदरी लावण्यलक्ष्मी रूपरागिणी
देवी मेनका अवतरताहे !
अहो सावधान !!"
निघे मदभरें कटाक्षाचे खेव देत चराचरा
पदस्पर्शानें शहारली काया धरणीमातेची.

तृणमिषानें उठले रोमांच.
वठल्या वृक्षांना फुटले धुमारे.
दिसूं लागली मधुरारक्त, रस-प्रसन्न चैतपालवी
जणूं मदनाच्या ईषदारुण विजयपताका.
गिरिनयनीं आले आनंदाश्रू.
वाहूं लागले सरिद्रूपानें.
शुक-सारिकांना फुटले कंठ.
सौंदर्यसंस्पर्शें घडे कायाकल्प अखिल विश्वाचा.
प्रतिवर्षींचा पाहुणा वसंत
युगायुगांनी आज पातला वनोपवनीं.
वसंताच्या या साम्राज्यामधीं विश्वामित्र जणुं शेषशिशिर.
आली वसंतश्री स्वयंसाक्षात् देण्यास्तव त्या—
विधीपूर्वक वसंतदीक्षा.
मग्न मुनिराज तपसमाधींत.
आरंभिलें नृत्य तयाच्या भोंवतीं स्वर्गांगनेनें.
अंगप्रत्यंगांचे क्षेप, निक्षेप, रेखावलयांचें विणीत जाळें
आली वाऱ्याची गंधनिर्भर, स्वरविव्हळ शीतल, झुळूक.

घालित विळखे त्याच्या अस्थिशेष देहाभोंवती,
प्रक्षुब्ध मुनि, खदिरांगार रक्तरंग त्याले नेत्र.
एक दृष्टिपातें करावें भस्म तपोभंजकाचें, उघडिले नेत्र,
पाहिले पुढां—
विश्व निमार्त्याचें सौंदर्यस्वप्न सदेह, साकार.
झालीं पंचेंद्रियें जागृत प्रबुद्ध.
सुप्त, प्रसूप्त प्रबल, प्रमाथी, विकार-वासना,
आल्या उधसून, पृष्ठभागावरीं.
घोंगावूं लागती हृदयकंदाच्या मोहळाभोंवती.
असह्य ते डंख !
अमेसारख्या कृष्ण निगूढ नयनांमधलें डहुळलें पाणी.
रंग क्रोधाचे नितळले आणि,
दिसूं लागली झांक निराळी, आगळीच कमा !
जणूं वैशाखाच्या उत्तप्त नयनीं ओथंबून आलीं
चंचल रसार्द्र श्रावण-स्वप्नें !
चळला मुनि !
मेनकेमागुती धांवू लागला वेड्यापिशापरी.



मराठी ... संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों: दि: ............

तपःश्रांत शीर्ष क्षण विसावलें, फुंद वक्षावरी
आणि अधरींच्या स्वर्गसुधेंत
भिजले ओठ शुष्क कोरडे.
हर्षला स्वर्ग करी जयघोष मेनकादेवीचा
हर्षली धरा, हर्षलें पाताल, करी जयघोष.
त्रिलोकीं भरली जयघोषांची जणूं घोषयात्रा
झाली मुक्त धरा.
नवचैतन्यें लवथवलें अखिल जीवन—
स्वर्ग धरेच्या या मंगल मीलनीं.
अवतरली शकुंतला जणू स्वर्भूसंगम
माता भरताची, सर्वदमनाची.
घडिलें जयाने भारत वर्ष
असशी मेनके तूंच निर्मात्री भारतवर्षाची !
आज पुनरपि तुज आवाहन तुज पाचारण.
हवा घडाया व्यक्तीला सौंदर्यशक्तींचा दिव्य साक्षात्कार.
सौंदर्यसंस्पर्शें घडे कायाकल्प अखिल विश्वाचा.
आसन्नमरण वसुंधरेला हवी द्यावया सुंदरतेची मृत्युंजयमात्रा.

कलाकारकरीं साकारतील जीवनस्वप्नें नित्य नवोनव

घडो दर्शन तेथ तुझें आम्हां !

काव्य कृतींच्या ओळी ओळींत तुझ्या श्वासाचा येवो परिमल

नृत्यकारांच्या चरणचालींत लागो चाहूल तुझीच मेनके !

चित्रकाराचा नाजुक कुंचला सदैव पाहो तुझींच स्वप्नें
घडो सर्वत्र तुझा साक्षात्कार !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २९२५८ वि. काव्य
क्रमांक ९३५२ नों: दि: 23/7/58

REFBK-0009091
REFBK-0009091

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.